MHGA130000312023

सत्र खटला क्र.०१/२०२३
(जुना क्र.७२/२००८)
महा.शासन मार्फत पोलीस स्टेशन,
आसरअली –वि– बापु जंगम+२

निशानी ५५ वरील आदेश
(दि.०८/०९/२०२३)

१. अर्जदार/आरोपी अशोक उर्फ कोंडन्ना पोचम कावेरी राह. नडीकुडा, ता. सिरोंचा जि. गडचिरोली याला तो न्यायालयाल पेशीवर हजर न राहील्यामुळे न्यायालयाने त्याचेवर गैरजमानती वारंट काढल्यामुळे पोलीस स्टेशन आसरअली यांनी दि.१८.०७.२०२३ रोजी त्याला अटक केली. त्यामुळे त्याने कलम ४३९ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे आसरअली पोलीस स्टेशन येथील अप. क्र.१०/२००७ मध्ये भा.दं.वि. कलम ३०७ सह कलम ३४ अन्वये नोंद असलेल्या गुन्हयामध्ये नियमीत जामीन मिळणेसाठी अर्ज दिला आहे.

२. तपासणी अधिकारी यांनी अर्जास त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र. ५६ नुसार दिले की, सदर आरोपी हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून त्याचे विरूध्द दाखल गुन्हयामध्ये तो तारखेवेळी मा. न्यायालयात हजर राहत नसून आरोपीचा जामीन झाल्यास तो पुन्हा गंभीर स्वरूपाचे गुन्हे करण्याची व कोर्टात हजर न राहण्याची शक्यता आहे. वरील कारणांमुळे अर्जदार/आरोपीचा जामीन अर्ज नामंजुर करण्यात यावा ही विनंती करण्यात येते.

३. अर्जदार/आरोपीतर्फे वकीलांनी व्हि. सी. द्वारे असा युक्तीवाद मांडला की, अर्जदार हा कामानिमित्त बाहेर गावी गेल्याने तो पेशी तारखेवर हजर राहीला नाही परंतु या नंतर तो नियमित हजर राहील. करीता दंड लादुन त्याचा जामीन अर्ज मंजुर करण्यात यावा. याउलट तपासणी अधिका–यांनी असा युक्तिवाद मांडला की, आरोपी हा न्यायालयाचे आदेशाची अवहेलना करण्याचे हेतुने गैरहजर होता आणि बरेच दिवसापासून तो मिळून येत नव्हता. सरते शेवटी त्याच्यावर वारंटची कारवाई दि.१८.०७.२०२३ करण्यात

आली तेव्हापासून आरोपी हा गजाआड आहे. त्यास जामीन दिल्यास तो पुन्हा गैरहजर राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती करण्यात येते.

४. एकुणच अर्जदार हा गैरहजर असल्याने वारंटची कारवाई करण्यात आली आणि त्यानंतर दि.१८.०७.२०२३ रोजी वारंट तामील करून अर्जदाराला अटक करण्यात आली. अर्जदार हा कामानिमित्त बाहेर गेल्याने गैरहजर होता असा जो युक्तिवाद अर्जदाराचे वतीने मांडण्यात आला परंतु त्या अनुषंगाने कोणताही दस्त दाखल करण्यात आला नाही. जेव्हा आरोपी गैरहजर होता तेव्हा त्याने न्यायालयाने लादलेल्या अटी व शर्तीचे भंग केलेले आहे तेव्हा आरोपीने भविष्यात न्यायालयाचे अटी व शर्तीचे भंग करू नये याकरीता दंड ठोठावून त्यास शर्ती व अटी लादून जामीन मंजुर करणे न्यायोचित होईल. करीता मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज निशानी ५५ मंजुर करण्यात येतो.

२. अशोक उर्फ कोंडन्ना पोचम कावेरी राह. नडीकुडा, ता. सिरोंचा जि. गडचिरोली याला आसरअली पोलीस स्टेशन येथील अप. क्र.१०/२००७ मध्ये भा.दं.वि. कलम ३०७ सह कलम ३४ मध्ये जामीन मंजुर करण्यात येते.

३. अर्जदाराने रक्कम रु.३०,०००/— जात मुचलक्याची (P.R. Bond) व तेवढयाच रकमेचा एक जामीन (Surety) देण्यात यावा.

४. अर्जदाराने दर पेशी तारखेला न्यायालयात हजर राहावे.

५. अर्जदाराने दंडापोटी रू.२०००/— तालुका विधी सेवा समिती अहेरी येथे जमा करावी.

Ravishankar Namdeorao Bawankar

Digitally signed by Ravishankar Namdeorao Bawankar
Date: 2023.09.08 17:11:13 +0530

अहेरी
दि. ०८/०९/२०२३

(र. ना. बावनकर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
अहेरी.